# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 31/12/2021 (शुक्रवार)

(दुपार)

---

### खून

पो.स्टे. भिवापुर :— अंतर्गत 25 कि. मी अंतरावर मौजा सालेभटटीचोर शिवार खुशाब झोडापे यांचे शेत येथे दिनांक 28/12/2021 चे 10.30 वा. ते दिनांक 30/12/2021 चे 12.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे— सौ. सुमन यादव झोडापे, वय 70 वर्ष, रा. सालेभटटीचोर ता. भिवापूर जि. नागपुर हिचे शेत 02 वर्षापुर्वी उमरेड येथे राहणारे राऊत यांना अडीच लाख रूपये प्रती एकर प्रमाणे बारा एकर शेती विक्री करण्यास फिर्यादीचे घराशेजारी राहणारे आरोपी यादव ढगे यांनी मध्यस्थी केले होते. शेतीची विक्री झाल्यावर रजिस्ट्री करून दिली. त्यावेळी यादव ढगे यांनी शेतीचे पुर्ण पैसे स्वतःजवळ ठेवुन घेतले व फिर्यादीला काहीच पैसे दिले नाही. त्यामुळे फिर्यादी, तिचे पती व मृतक हे यादव ढगे यांचाकडे वारंवार पैशाची मागणी करतांना यादव ढगे व त्याच्या भाउ अंबादास ढगे आणि आरोपी हे शिवीगाळ करून झगडा भांडण करीत होते व मारण्यास धावत होते. त्याच कारणावरून आरोपी नामे— 1) सुनिल यादव ढगे, वय 36 वर्ष, 2) अनिल यादव ढगे, वय 30 वर्ष, 3) संदीप अंबादास ढगे व 4) किशोर अंबादास ढगे सर्व रा. सालेभटटीचोर ता. भिवापुर जि. नागपुर यांनी संगनमत करून फिर्यादीचा मुलगा नामे— उदालत यादव झोडापे, वय 40 वर्ष रा. सालेभट्टीचोर यांचा नायलन दोरीने गळा आवळून खून केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. भिवापुर येथे आरोपीविरुध्द कलम 302, 34 भादंवि. सहकलम 3 (2)(5),3(2)(5)अ अनुसुचित जाती/अनुसुचीत जमाती अत्याचार प्रतिबंधक अधि. 1989. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपी क्र. 1 व 2 यांना अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास उपविभागीय पोलिस अधिकारी उमरेड विभाग श्री भिमराव टेळे हे करीत आहे.

### जबरी संभोग

1) पो.स्टे. नरखेड :— माहे सप्टेंबर 2021 ते डिसेंबर 2021 चे सुमारास आरोपी क्र. 1) मोतीराम पांडुरंग नारनवरे, वय 69 वर्ष, रा. पांढरी गायमुख ता. नरखेड याने फिर्यादी यांची वय 2 वर्ष 6 महिने या मुलीला लैंगीक अत्याचार केला. त्याबाबत फिर्यादीने आरोपी क्र 02 याला सांगीतले असता त्याने फिर्यादीला म्हटले की, ''तु कोनाला सांगु नको व पोलीस स्टेशनला तक्रार देवु नको'' याकारणावरून त्यांनी फिर्यादीला मारझोड केली व फिर्यादी व पीडित मुलीला मारून टाकण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. नरखेड येथे आरोपीविरुध्द कलम 376 (ए बी), 109, 506 भादंवि. सहकलम 4, 6, 16, 17 बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास महिला पोलिस उपनिरीक्षक सारिका गुरूरकर मो.क्र. 9665834999 हे करीत आहे.

2) पो.स्टे. काटोल :– दिनांक 01/01/2012 चे 00.00 वा. चे 18.30 वा. दरम्यान फिर्यादी/पीडित मुलगी वय 14 वर्ष 9 महिने हीची आरोपी नामे– चेतन रवी कळंबे, रा. सावरगाव ता. नरखेड सोबत अंदाजे जानेवारी 2021 मध्ये इंस्टाग्राम वर ओळख झाली होती. नंतर आरोपीने फिर्यादीस आपला मोबाईल क्रमांक दिला होता. आरोपी फिर्यादीला अश्लिल मॅसेज कॉल करून आपन लग्न करू असे म्हणत होता. त्यानंतर फेब्रुवारी 2021 मध्ये नागपुर येथे एका हॉटेलमध्ये भेटले होते. तेव्हा आरोपीने फिर्यादीचे मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला. त्यानंतर आरोपीने दि. 12/12/2021 रोजी शिवनेरी बार काटोल मध्ये एक रूम केले व तेव्हा त्याने फिर्यादी सोबत बळजबरीने जबरी संभोग केला. त्यानंतर दि. 29/12/2021 रोजी 10.30 वा. नागपूर वरून ट्रॅव्हल्सने काटोल येथे आली व आरोपी सोबत रेल्वे स्टेशन काटोल येथे भेट घेतली. दि. 30/12/2021 रोजी पीडिताने तिच्या सोबत आरोपी चेतन कळंबे यांनी इंस्टाग्रामवर केलेली मैत्री अश्लिल मॅसेज, चॅटींग व जबरदस्ती केलेल्याचे संपूर्ण माहिती तीने तिच्या आईला सांगीतली त्यामुळे आरोपीने फिर्यादी सोबत केलेल्या घटनेमुळे ती स्वतःला दोषी संमजून ती आत्महत्या सुध्दा करीत होती.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. भिवापुर येथे आरोपीविरुध्द कलम ३५४ A ( 1)( I), ३५४ A ( 1)( I), ३५४A ( 1)( II),३५४A ( 1)( IV),३५४D ( 1), ३७६,( 2)( 1),३७६( 2)( J),३७६( 3) भादंवि., सहकलम ४,८,१२ बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास म.पो.उपनि. पुनम कोरडे मो.न. 7276330455 या करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर